म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङ्मय
वा. नं. १५६

म. ग्रं. सं. ठाणें

# विजय

के. नारखेडे



ठा० क्र-२३८३

# विजय

( वीर – कथा – संग्रह )

म. ग्रं. सं. ठाणे
१८ . ५ . १९५

लेखक

के. नारखेडे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र ..२३८३........ नों दि ..............
वि. ..........
IRBK-0102383

१९४६

IRBK-0102383

मूल्य ६ आणे

निर्माते—

म. द. लोखण्डे
गो. ह. अभ्यंकर
ज्योति प्रकाशन
३८६ सदाशिव, पुणें २

◆

मुद्रक—

प्र. भा. काळे
प्रतिभा मुद्रणालय
३३५ शनिवार, पुणें २

◆

प्रकाशक—

गो. स. मदाने
भारत प्रकाशन
नवगृही, धुळें

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. ]

★

ज्योति प्रकाशन

* अनुकार
* स्वयंसेवक चळवळी
* दोन जगें
* विजय

म. ग्रं. सं. ठाणे.

बेचाळीसच्या स्वातंत्र्य संग्रामांतील
अज्ञात बालवीरांना—

# आमचें प्रकाशन

★

| | | रु. आ. पै |
|---|---|---|
| क्रांति | सानेगुरुजी | ३–८–० |
| तीन मुलें | ,, | २–८–० |
| राष्ट्रीय हिंदुधर्म | ,, | २–०–० |
| समाज धर्म | ,, | ०-१२-० |
| स्त्रीजीवन | ,, | ३–४–० |
| ईश्वरचंद्र विद्यासागर | ,, | १–८–० |
| बोलघेवड्या | ना. धों. ताम्हनकर | ०-१२-० |
| मंगळागौरीच्या रात्रीं | त्रि. त्रि. बोकील | २–८–० |
| गावगुंड | ग. ल. ठोकळ | ३–०–० |
| सुगंध | ,, | २–४–० |
| मीठभाकर | ,, | २–८–० |
| आजच्या गोष्टी | के. नारखेडे | ०–८–० |
| काव्यकलेचें अंतरंग | ,, | २–०–० |
| चौफुला | आचार्य भागवत | १–०–० |
| दुसरी आघाडी | अ. ग. करंदीकर | १–०–० |
| आगरकरांशीं ओळख | पु. पां. गोखले | ५–०–० |
| आगरकर चरित्र | ,, | ०–६–० |

**द. र. कोपर्डेकर प्रकाशन, पुणें.**

# विजय

**आ**ज शिवबांचें मन अत्यंत विषण्ण झालें. त्यांचा दुर्दम्य उत्साह थिजून गेला. त्यांच्या मुखावरची दिव्य कांति एका क्षणांत काजळली. त्यांचा पराक्रम-तेज-बुद्धि एका दिवसांत मावळून लुप्त झाली. त्यांचें हृदय दुःखावेगानें व्याकळून गांगारून हतप्रभ झालें.

इतका विषाद पूर्वी त्यांना कधींहि वाटला नव्हता. त्यांची बुद्धि अशी हतप्रभ केव्हांही झाली नव्हती. त्यांच्या मुखावरचें हास्य, पूर्वी कोणत्याहि प्रसंगीं असें मावळलें नव्हतें. उभी हयात त्यांनीं संकटांशीं टक्कर देण्यांत घालविली होती. सारें आयुष्य मृत्यूशीं झुंज खेळण्यांत व आनंदानें त्याचें स्वागत करण्यांत त्यांनीं खर्च केलें होतें. उशापायथ्याशीं हलहल ओकणारे सर्प नाचत असतां रखरखलेल्या आगीच्या बिछान्यावर त्यांनीं शांत मनानं झोंप घेतली होती. डोक्यावर आभाळ कोसळून पडत असतां मान ताठ करून त्यांनीं तें सावरून धरलें होतें. त्यांना ठार मारण्याचा पैजेचा विडा उचलून अफझुलखानासारखा बांका वीर दांत-ओठ खात आला असतां, त्याला भेटायला जातांना त्यांचें मन कधीं गांगरलें नव्हतें. प्रिय पित्याला भिंतींत चिणून ठार करण्याचा धाक घातला गेला असतांही त्यांचें हृदय कधीं थरारलें नव्हतें. दिल्लीश्वरानें आपल्या मगरमिठींत पकडून, सक्त बंदोबस्तानें तुरुंगांत कोंडून ठेवलें असतांही त्यांची बुद्धि कधीं अविचिलित झाली नव्हती, कीं त्यांचा चेहरा कधीं विषादानें व्यापून गेला नव्हता.

मग अितकें बेचैन व्हायला, असें थिजून जायला आजच कोणतें असें कारण घडलें होतें ?

पारतंत्र्याच्या अंधारांत अश्रू गाळीत बसलेल्या महाराष्ट्रदेवतेला त्यांनीं स्वातंत्र्याचा सूर्य दाखविला. आपल्या पराक्रमानें, बुद्धिसामर्थ्यानें, धाडस-

साहसानें साऱ्या शत्रूंना खडे चारून त्यांनीं पळवून लाविलें. शिवबांना आपल्या वेशीवर फांशी द्यायची इच्छा करणारे विजापूर-गोवळकोंड्याचे बादशहा यांच्यासमोर नामोहरम होऊन त्यांच्याबरोबर स्नेहाची अपेक्षा करूं लागले. दिल्लीश्वरानें त्यांच्यापुढें हात टेकले. सगळीकडे शिवबांचा विजय झाला. हिंदुत्व रक्षणाकरितां, गोब्राह्मणाच्या प्रतिपालनाकरितां रात्रंदिवस झटणाऱ्या शिवबांना विजयश्रीनें माळ घातली. 'गोब्राह्मण प्रतिपालक' अशी बिरुदावली मोठ्या अभिमानानें त्यांनीं आपल्या नांवासमोर जोडली. या साऱ्या विजय-श्री-लाभाची परिणती म्हणून त्यांनीं स्वतःला राज्याभिषेक करवून घ्यायचें ठरविलें.

आणि शिवबांच्या सूक्ष्म दूरदृष्टीलाही कधीं न दिसलेली, त्यांनीं कधीं स्वप्नांतही न कल्पिलेली अशी विलक्षण गोष्ट महाराष्ट्रानें—त्यांच्या प्रिय महाराष्ट्रानें त्यांच्या अनुभवास आणून दिली.

शिवबा राज्याभिषेक करवून घेणार हें कळतांच साऱ्या महाराष्ट्रांत एकच धांदल उडाली. ठिकठिकाणाचे ब्रह्मवृंद गोळा होऊं लागले. त्यांच्यामध्यें वाद सुरू झाले. विद्वान ब्राह्मण आग्रहानें पूर्वपक्ष—उत्तरपक्ष करूं लागले. पैठणाला ज्ञानवंतांची सभा भरली. शिवाजी शूद्र आहे, त्याला राज्याभिषेक करून घेण्याचा अधिकार नाहीं, असें कोणी प्रतिपादूं लागले; तर कोणी त्याच्या क्षत्रियत्वाबद्दल शंका घेऊं लागले. पोथ्या चाळल्या जाऊं लागल्या. जुनीं बाडे उपसून काढण्यांत येऊं लागलीं. शिळे मंत्र नव्या जोमानें गर्जनेनें पुढें मांडण्यांत आले. क्षत्रियत्वाच्या व्याख्येचा कीस पडूं लागला. शूद्राचे अधिकार—हक्क यांवर व्याख्यानें झडूं लागलीं. आणि साऱ्या ब्रह्मवृंदानें एकमुखानें निर्णय सांगितला, "शिवाजी शूद्र आहे. त्याला राज्याभिषेक करवून घेण्याचा अधिकार नाहीं."

आणि ही बातमी कळतांच शिवबा बेचैन झाले, त्यांची मुखकळा विटून गेली, ते निरुत्साह झाले तर त्यांत काय आश्चर्य आहे !

ज्या महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां त्यांनीं आपल्या रक्ताचें पाणी केलें होतें त्या महाराष्ट्रानेंच असा त्यांचा अवमान केला होता. ज्या ब्राह्मणांचा जाति धर्म हा टिकून रहावा म्हणून ते मृत्यूबरोबर खेळ खेळले होते, त्याच ब्राह्मणांनीं असा निर्णय दिला होता. ज्यांच्या पराक्रमामुळें त्यांची शेंडी दाढीला न चिकटतां कायम राहिली होती, त्यांच्या सभा बिनधोक पार पडूं लागल्या होत्या, त्या शिवबाच्या पराक्रमाची—क्षत्रियत्वाची त्याच लोकांनीं शंका प्रदर्शित केली होती. ज्यांचा प्रतिपालक म्हणून मिरविण्यांत शिव-बांना अभिमान वाटत होता, त्यांनींच त्यांच्या शिरावर असा प्रहार केला होता. ज्या धर्माचें पालन—रक्षण करण्यांत शिवबांनीं सारें आयुष्य घालविलें होतें; त्याच "धर्माच्या संरक्षकांनीं" त्यांना शूद्र ठरविलें होतें. ज्या शिवबांच्या पराक्रमानें भोंवतालचे महापराक्रमी सम्राट दिपून गेले होते, ते शिवबा "क्षत्रिय नाहींत, त्यांना राज्याभिषेक करविण्याचा अधिकार नाहीं" असें त्यांच्याच पराक्रमावर जगलेल्या लोकांनीं जाहीर केलें होतें. ज्या धर्माचें रक्षण करण्यांत शिवबा यशस्वी झाले होते त्या धर्मांत त्यांना जागा नाहीं, उच्च संस्कार करून घेण्याचा अधिकार नाहीं, ते शूद्र आहेत. असा सर्व धर्ममार्तंडांनीं अेकमुखी निर्णय दिला होता.

शिवबा या अनपेक्षित फटकाऱ्यानें हतबुद्ध झाले. या कृतघ्नतेनें त्यांचें मन व्याकळून गेलें. तानाजीच्या मृत्यूनंतर आज पुन्हां त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. त्यांचें खंबीर मन, त्यांची दगडाशीं टक्कर द्यायला समर्थ अस-लेली छाती या प्रहारानें हबकून खचून गेली.

शत्रू समोर तरवार घेवून धांवत आला असतां त्याला लोळवणं कांहीं कठीण नाहीं, दुष्ट-दुर्जनांनीं विणलेल्या जाळ्यांतून निसटून जाणं सहज सुलभ आहे, कपटपटूंचें कृष्णकारस्थान हाणून पाडून, त्यावर मात करणें जागरूक धीमान पुरुषाला अशक्य नाहीं; पण आपल्याच हृदयांत दुखूं लागलें, आपल्याच रक्तांत विष भिनलें, आपल्याच दातांखालीं जीभ सांप-

डली, तर प्रतिकार कोणाचा व कसा करायचा ? शहाणपणाच्या घमेंडींत आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला तर कोणाच्या गालांत मारावयाचें ? जिवाची छाया करून जोपासलेल्या लतेला कुजकीं फळें आलीं तर काय करावयाचें ? लता उपटून टाकायला हात कसा धजावेल ?

अंधारांत असा जिव्हारी घाव बसल्यामुळें शिवबा गांगरले. शिवबांना काय करावें हें सुचेना ! सारें सोडावें, कोठेंतरी दूर दूर निघून जावें, या देशाचें, या लोकांचें नांव नको असें त्यांना क्षणभर वाटलें; पण त्यांनीं आपल्या मनाला सावरलें. भावनेला विवेकानें आवर घातला. थोड्याच वेळांत त्यांनीं आपल्या प्रक्षुब्ध विचारांवर विजय मिळविला.

काशीक्षेत्र हें हिंदूंचें सर्वश्रेष्ठ क्षेत्र. तेथील विद्वानांनीं दिलेला धर्म-निर्णय सर्व भारतांत शिरसामान्य समजला जातो. त्या निर्णयाविरुद्ध कुणीहि ब्र काढूं शकत नाहीं. तेथील विद्वान् केवळ पुस्तकी पंडित नव्हेत. धर्माधर्माचा विचार सूक्ष्मपणानें करितांना बुरसलेल्या कल्पनांत त्यांचीं मनें कधीं लडबडत नाहींत कीं, रूढीच्या पडद्यामुळें त्यांच्या डोळ्यासमोर कधीं अंधार उत्पन्न होत नाहीं. कठोर सत्य त्यांच्या तीक्ष्ण दृष्टींतून कधीं सुटूं शकत नाहीं.

शिवबांनीं आपल्या विश्वासू माणसांना काशीला पाठविलें. त्यांनीं तेथील ज्ञानवंतांना सारी हकीकत सांगितली.

शिवाजीसारख्या माणसाची महाराष्ट्रानें केलेली दशा पाहूनही त्यांना अत्यंत खेद झाला. धर्माच्या नांवाखालीं महाराष्ट्रानें घातलेला गोंधळ पाहून त्यांना विषाद वाटला. त्यांचा अेकमताचा निर्णय महाराष्ट्राला अैकण्याकरितां व योग्य ते विधि करण्याकरितां तेथून गागाभट्ट नांवाच्या थोर शास्त्र्याला महाराष्ट्रांत पाठविण्यांत आलें.

असंख्य तारका आकाशांत दिमाखानें चमकत असतात, पण सूर्योदयानें हतप्रभ होअून त्या तोंड लपवून बसतात. प्रबल वाऱ्यानें मशकें सहज उडवून दिलीं जातात; अगदीं तसेंच झालें.

गागाभट्टासमोर कोणीही आमचा विद्वान उभा राहूं शकला नाहीं. त्यांच्या विद्वत्तेपुढें कोणालाही बोलण्याचें धैर्य झालें नाहीं. पारतंत्र्यांत खितपत पडून नादान बनलेल्या मनोवृत्तीला त्यांचें दिव्य तेज असह्य झालें. सर्वांनीं त्यांच्यापुढें मान झुकवली. सोनारानेंच नाहींतरी नेहमीं कान टोचले पाहिजेत.

मोठ्या थाटानें राज्याभिषेक समारंभ झाला. शिवबा हिंदुपदपादशहा झाले. त्यांच्या डोक्यावरील छत्र धरण्याचें भाग्य मिळावें म्हणून त्यांना विरोध करणारे ईर्ष्येनें पुढें होण्याची धडपड करूं लागले.

शिवबांच्या सर्व विजयांपेक्षां हा विजय अधिक भव्य–दिव्य होता ! त्यांच्या हृदयाला झालेली जखम या विजयानें भरून आली. त्यांना आपलें महत्कार्य करायला नवा जोम--उत्साह प्राप्त झाला.

---

# अज्ञात समाधीवर

शिवाजी महाराज मृत्यूशीं झुंजायला निघाले होते. काळाशींही टक्कर देणाऱ्या साथीदारांची त्यांना जरूर होती. मृत्यूच्या जबड्यांत उडी घेऊन त्याचे दांत मोजणारा वीर त्यांना बरोबर न्यावयाचा होता. कळिकाळा-समोर दंड थोपटून उभा राहणारा निधड्या छातीचा दोस्त त्यांना पाहिजे होता. कोसळणाऱ्या आकाशाला सांवरून धरण्याचें सामर्थ्य असलेला वीरपुंगव त्यांना पाठीशीं हवा होता.

प्रसंगच तसा बिकट होता. स्वराज्याची वेल नुकतीच कोठें जीव धरूं लागली होती तोंच ती वेल, तिला लावणाऱ्या माळ्यासकट तुडवून टाक-ण्याची प्रतिज्ञा करून महाबलशाली सरदार अफझुलखान विजापुराहून आला होता. मनगटासारखी जाड पहार लीलेनें वाकवून तिचे कडे तो शत्रूच्या गळ्यांत घालीत असे. एक बोकड त्याला न्याहारीला लागत असे.

नीति–अनीतीची त्याला कल्पनाहि नव्हती. कसेंहि करून आपला हेतू पूर्ण करून घ्यावा, एवढेंच तो जाणत असे. मुरगीची मुंडी मुरगळण्यांत व मनुष्याची मान पिळण्यांत त्याला कांहींच फरक वाटत नसे. देवानें गर्दांत त्याचें काळीज उलटें जोडलें होतें.

अशा अफलझुखानाची व शिवाजी महाराजांची भेट ठरली होती. प्रत्येकानें बरोबर फक्त एकच माणूस आणावयाचा असें ठरलें होतें. अफझुलखानाचा शरीररक्षक सय्यदबंडा त्याच्याबरोबर येणार होता. सय्यदबंडा पट्टीचा तलवार बहाद्दर होता. उभ्या दख्खनमध्यें त्याच्या तरवारीची तीक्ष्ण धार प्रसिद्ध होती. ताकदीच्या बाबतींत प्रसंगीं तो खानावरहि ताण करीत असे. खानाचा शब्द हेंच त्याचें कुराण होतें. खानाचा तो निष्ठावंत इमानी सेवक होता. कोणालाहि खानाच्या केसाला त्याच्या जिवांत जीव असेंपर्यंत धक्का लावणें शक्य नव्हतें.

अशा ह्या अहीमहीच्या जोडीला शिवबा भेटावयास जावयाचें होतें. खानाच्या सय्यदबंडाप्रमाणें त्यांना स्वतःबरोबरहि एक साथीदार न्यावयाचा होता. जिवावर पाणी सोडून शिवबाबरोबर जाणारे कितीतरी बहाद्दर शिवबाभोंवतीं होते. शिवबांचा तानाजी होता. हत्तीशींहि टक्कर देईल असा त्यांचा येसबा होता, आपल्या भाल्याच्या टोंकावर शत्रूंना नाचविणारा नेताजी होता. प्रताप–बाजी होते, हिरोजी–साबाजी होते.

पण—

—पण केवळ जिवावर उदार होऊन मृत्यूच्या जबड्यांत उडी टाकणारा वीर शिवबाला नको होता.

भेटींत दगा होईल ही शिवबांची खात्री होती. आणि शत्रूनें दगा करून यश मिळविलें तर स्वराज्याची धडपड कायमची थांबणार होती. स्वराज्य हा शब्दहि शिल्लक राहणें कठीण होते. त्यांनीं ज्याचा पाया घालण्यास

सुरवात केली होती, तें त्यांच्या कल्पनेंतील स्वराज्यमंदीर कायमचें उध्वस्त होणार होतें. हिंदवी स्वराजाची कल्पना जमीनदोस्त होणार होती.

आणि म्हणूनच केवळ जिवावर उदार होऊन मृत्यूच्या मुखांत उडी टाकणारा वीर शिवबांना नको होता. मृत्यूचीहि आंतडी फाडणारा बलशाली मैदानमाप छातीचा मर्द त्यांना पाठीशीं हवा होता. शत्रूंनीं दगा केलाच तर त्यांना खडे चारील असा वीरसिंह त्यांना बरोबर न्यावयाचा होता. खानाची ताकद व सय्यदची तलवार या दोघांना पुरून उरणारा रणझुंजार शिवबाला पाहिजे होता. खानाचे दांत आपणच खानाच्या घशांत घालूं ही महाराजांची खात्री होती; पण सय्यदबंडाची तलवार त्याच्याच पोटांत खुपसून त्याची आंतडीं चिरणाऱ्या तलवारबहाद्दरची शिवबाला जरूर होती. दगा झालाच तर ज्याच्या बळानें, तलवारीनें, हिमतीनें व प्रसंगीं हिकमतीनें हटकून यश मिळेल असा खात्रीचा साथीदार शिवबांना पाहिजे होता.

असा एकच वीर शिवबांना आढळला. बंडावरच काय पण मृत्यूवरहि विजय मिळूं शकेल असा एक पूर्ण भरवंशाचा योद्धा शिवबांना माहीत होता, ज्या नरश्रेष्ठाचा शिवबांना इतका विश्वास वाटला, ज्याच्या आधारावर अशा महाकपटी खानाच्या भेटीस जाण्याला शिवबा तयार झालें, त्या नररत्नाचें नांव ······ **जिवाजी महाले.**

पुढचा प्रसंग कोणाला माहीत नाहीं ? खानानें शिवबांची मान बगलेंत दाबली; तेव्हां त्यांनीं त्याची आंतडी ओढून बाहेर काढली आणि जिवानें सय्यदबंडाचा तलवार उगारलेला हात छाटला व त्याचा कोथळा बाहेर काढून जमिनीवर फेकला.

स्वराज्याच्या बालपणातलें हें भयंकर संकट दूर झालें. त्यावेळीं जर खानाला यश मिळालें असतें, तर महाराष्ट्र कायमचा गाडला गेला असता. याचवेळीं हिंदवी स्वराज्याला कायमची मूठमाती मिळाली असती.

स्वराज्याची कल्पना, कल्पनाच ठरली असती. भीमाकांठचे घोडे गंगेचे पाणी पिऊं शकले नसते, कीं अटक झुगारून अटकेपार उडाले नसते. 'आमचा महाराष्ट्र' असे अभिमानाचे उद्गार आमच्या तोंडांत घोळले नसते. फार कशाला महाराष्ट्राला इतिहासच राहिला नसता.

जिवबा महाल्यांनीं स्वराज्याच्या गळ्याला आवळूं पाहणारी तांत तोडली. इतिहासांत जिवबांच्या पराक्रमाचें वर्णन नाहीं. स्वराज्य स्थापन करितांना त्यांनीं काय कामगिरी केली, ही इतिहासाच्या पानावर नमूद केलेली नाहीं. पण आम्हांला त्याची पर्वा नाहीं. महाराष्ट्राच्या भव्य इतिहास-मंदिराचा पाया घालणाऱ्या थोरव्यक्तीचें रक्षण करण्याची अलौकिक कामगिरी जिवबांनीं केली आहे. स्वराज्याच्या बालसूर्याला लागूं पाहणारे ग्रहण त्यांनीं दूर केल्या-मुळेंच तो पुढें तेजानें तळपूं लागला. इतिहासांत त्यांना एकाद्या कोपऱ्यांत स्थान असेल, पण आम्हांला महाराष्ट्राचा सारा इतिहास त्यांच्या नांवाच्या दोन शब्दांत साठविलेला दिसतो. त्यांना आमच्या हृदयांत स्थान मिळालें आहे. आम्ही जिवाजी महात्म्यांच्या अज्ञात समाधीवर प्रत्यही भक्तीचीं फुलें उधळतों.

---

## ऊठ, रडतोस काय ?

नागोरच्या तटाशीं वर्षभर मराठे धडका देत होते. किल्ला अतिशय बळकट ! आंत कसलेले रजपूत शिपाई! बिजेसिंगासारखा चतुर रणकुशल पुढारी त्यांना लाभलेला ! आणि म्हणूनच जयाजी शिंद्यासारख्या झुंझार वीराला रजपूत वर्षभर टक्कर देऊं शकले.

रजपूत व मराठे दोघेही सारखेच कणकर व हटेले. मारूं कीं, मरूं ही दोघांचीही वृत्ति. शक्ति, पराक्रम यांत अेकमेकाला हार न जाणारे. सारखे वर्षभर झगडत होते. प्राण पणाला लावून लढत होते. पण यशापयश ठरेना.

जयाजीरावांनीं सर्व बाजूंनीं नाकेबंदी केली. आंतून बाहेर जाणें अशक्य झालें. बाहेरून कांहीं मिळणें मुष्कील झालें. किल्ल्यांतील सांठा संपत आला. बिजेसिंग जेरीस आला, हताश झाला. पराक्रमावर परिस्थितीनें मात केली.

बिजेसिंगानें आपल्या साऱ्या सरदारांना बोलाविलें. तो वैतागानें म्हणाला, "जयाजी शिंद्याचा कांटा काढण्याचें धैर्य तुमच्यांपैकीं कोणाच्याही अंगांत नाहीं काय ? आपल्या प्राणावर उदार होऊन, शिर हातावर घेऊन त्याला ठार मारावयास जाणारा अेकही रजपूत आपल्या मध्यें असूं नये ! असेच अडकून पडलों तर अन्नपाण्यावांचून मरायची पाळी येअील. सर्वांच्या रक्षणाकरितां स्वतःच्या प्राणावर पाणी सोडावयास तयार असणारा वीर कोण आहे ? अेकदां जयाजी पटेल जर नाहींसा झाला..."

तीन रजपूत वीर पुढें आले. जयाजी शिंद्यांना ठार मारण्याची अगर त्या प्रयत्नांत मरून जाण्याची त्यांनीं प्रतिज्ञा केली. जयाजीला ठार करून ती बातमी कशाहि रीतीनें किल्ल्यावर कळविण्याचा त्यांनीं निश्चय केला. बिजेसिंगाला समाधान वाटलें.

ते तिघेहि वीर भिकाऱ्याच्या वेषांत मराठ्यांच्या छावणीमध्यें आले. अंगावर चिंध्या लोंबत होत्या; पण त्यांच्या आड तीक्ष्ण सुरे लपविलेले होते. बावळट मुखावर शांतता दिसत होती. पण हृदयांत आग भडकली होती. आपल्या देशबंधूंच्या रक्षणाकरितां ते मारेकऱ्यांचें निंद्य काम करायला तयार झाले होते. मृत्यूपेक्षांही अपकीर्तीला अधिक भिणारे ते योद्धे आपल्या नांवाला, आपल्या कुळाला कायमचा कलंक लावायला तयार झाले होते. लढतां लढतां शत्रूच्या हातांतलें शस्त्र उडालें असतां हातांतील तरवार फेकून देणारे ते रणझुंजार पाठींत सुरा खुपसायला उत्कंठित झाले होते.

जयाजीरावांच्या तंबूभोंवतीं ते अनुकूल संधीची वाट पाहूं लागले. डोळ्यांत तेल घालून फिरूं लागले.

कांहीं वेळ गेला. संधि चालून आली. तंबूबाहेर एक चौरंग टाकण्यांत आला. जयाजीराव स्नानास आले. एक खिदमतगार पाणी घालूं लागला. दुसऱ्यानें त्यांच्यावर छत्र धरलें. जयाजीराव अंग चोळूं लागले.

जवळच घोड्याची पागा होती. तेथें तीन भिकारी सांडलेले दाणे वेचीत होते. दाणे वेचण्यांत ते गुंग झालेले दिसत होते, पण त्यांचे डोळे मधून मधून हळूंच जयाजीरावांकडे वळत होते ! जयाजीचें स्नान आटोपलें. खिदमतगार पाण्याचें घंगाळ उचलून घेऊन नेला. नेहमींप्रमाणें डोक्यावरून रुमाल घेऊन जयाजीराव डोळे चोळूं लागले. मारेकऱ्यांना संधि मिळाली. तिघांनीं धांवत येऊन एकदम आपले सुरे जयाजीरावांच्या अंगांत खुपसले. जयाजीराव खालीं पडले. साऱ्या छावणींत हाहाःकार उडाला.

मारेकऱ्यांपैकीं दोघे तेथेंच ठार झाले. एक मात्र गर्दीत निसटला. तो धांवतच बिजेसिंगाकडे गेला. बिजेसिंगाला पाहिजे होतें तें मिळालें. 'जयाजी मेला,' आतां उरलेल्या मराठ्यांना आपण सहज झोडपून काढूं या खात्रीनें सर्व रजपूत "जय एक लिंगजी" म्हणून जयघोष गर्जत मराठ्यावर चालून गेले. जयाजीराव विव्हळ होऊन पडले होते. जवळ सर्व मातबर मराठे सरदार अश्रू गाळीत होते. जयाजी-दत्ताजी म्हणजे भीमार्जुनाची जोडी. अकालीच भीम अर्जुनाला सोडून जायला निघाला. दत्ताजीच्या डोळयांतून अश्रुधारा वाहात होत्या. कोणीही त्याचें सांत्वन करूं शकत नव्हता.

शत्रू हर्षानें नाचत येत होता. मराठे आपल्या नायकाकडे पाहून दुःखानें रडत होते. शत्रूचीं रणवाद्यें गर्जत होती. मराठे शोकानें व्याकूळ झाले होते. शत्रू जयजयकार करीत हर्षोन्मादानें धांवत येत होते. मराठे गुढग्यांत मान घालून दीर्घ उसासे टाकीत बसले होते.

जयाजीरावांनीं डोळे उघडले. शत्रूचा जयघोष त्यांनीं तेव्हांच ओळखला. सारी परिस्थिती एकदम त्यांच्या लक्षांत आली. त्यांचे डोळे लाल झाले. कसातरी उठण्याचा ते प्रयत्न करूं लागले.

समोर दत्ताजी रडत होता.

" दत्ता, अूठ ! असा भागूबाईसारखा रडत काय बसलास ? शत्रू समोर मिरवीत येत असतां रडत बसतोस ? शिंद्यांच्या—मराठयांच्या ब्रीदाला बट्टा लावतोस ? भाअूतर मिळणार नाहींच; पण गेलेली अब्रूही मिळणार नाहीं. जा ! मरतांना मला तुझा पराक्रम पाहूं दे. शत्रूंचीं शिरें अुडवीत नाचणारी तुझी शूर मूर्ति पाहतां पाहतां मला डोळे मिटूं दे. मरणापूर्वी मला विजयाची बातमी अैकूं दे. शत्रूला त्याच्या नीचपणाचें प्रायश्चित देअून बंधूच्या मरणाचा सूड अुगवायचा सोडून रडतोस ? नादान—"

डिंवचलेल्या वाघाप्रमाणें दत्ताजी खवळून अुठला. तरवार उपसून त्यानें जयाजीरावांच्या पायांना वंदन केलें. " हर हर महादेव " म्हणून जयाजींच्या शब्दांनीं खवळलेले ते मराठे शत्रूवर तुटून पडले.

घनघोर युद्ध झालें.

जयाजीराव वेदना विसरले. दत्ताजीच्या वीरमूर्तीबरोबर त्यांचे डोळे फिरूं लागले. आणि त्यांनीं जेव्हां पाहिलें.—

"पाठीवर कधींही वार न घेणाऱ्या रजपुतांना पळतां भुअी थोडी झाली."

—तेव्हां समाधानानें त्यांनीं प्राण सोडला.

---

# खरा क्षत्रिय

" **आ**म्ही असा भ्रष्टाकार कधींही सहन करणार नाहीं. प्राणापेक्षांही धर्म आम्हांला अधिक प्रिय आहे. असा सांवळा गोंधळ कोणाला आवडेल ? " सारे चवताळून म्हणाले.

" चला, असेच्या असे प्रभूकडे जाअूं या. या गोष्टीचा प्रथम निकाल लागला पाहिजे."

सारे सवाअी माधवरावांकडे आले.

अ. का. २३८३ ... कोवां

थोरल्या माधवरावांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचें ग्रहमान बदललें होतें. त्यांच्या वैभवाला उतरती कळा लागली होती. त्यांचा पराक्रम विफल ठरूं लागला होता. ठिकठिकाणीं त्यांना माघार घ्यावी लागत होती. त्यांच्या समोरून ज्यांना पळतां भुअी थोडी होत होती, तेच आतां दिमाखानें–ताठ्यानें त्यांच्यासमोर अुभे राहण्याचें धाडस करूं लागले होते.

निजामानें या स्थितीचा फायदा घ्यायचें ठरविलें.

मराठ्यांना द्यावयाची खंडणी त्यानें नाकारली. पेशव्यांना व नानांना अुद्धटपणाचा निरोप पाठविला. "मराठ्यांनीं पूर्वीं अनेक वेळां आपला पराभव केला. अनेकदां आपल्याला मोठी नामुष्की पत्करावी लागली. पण आतां आपण पूर्वींच्या साऱ्या अपमानांचा वचपा काढूं, सारें अपयश धुअून काढूं. साऱ्या नुकसानीची भरपाअी करून घेअूं. मराठ्यांना असे झोडपून काढूं कीं, पुन्हा त्यांनीं आपलें नांव घेअूं नये!" असे विचार निजामाच्या मनांत घोळूं लागले, आणि दिवाण मशीर यानें त्याला भर दिली.

कडेकोट तयारी करून त्यानें पुण्यावर चाल केली. पुण्याचें नांव घेतांच निजामाला थरकांप सुटत असे. त्याचे हातपाय लटपटूं लागत. जीभ कोरडी पडत असे. पण आतां मोठ्या अुत्साहानें पुण्याच्या रोखानें तो धावूं लागला. आजपर्यंत हृदयांत धगधगत असलेली अवमानाची आग त्याला विझवायची मोठी अुमेद वाटूं लागली. आपल्याकडून प्रत्यहीं खंडणी वसूल करणाऱ्या मराठ्यांना सारा पैसा आतां ओकायला लावतां येईल असें त्याला वाटूं लागलें. साऱ्या हिंदुस्तानांतून चौथाई–सरदेशमुखी लुबाडून संपन्न झालेल्या पुणें शहराची लूट करायचें स्वप्न त्याला दिसूं लागलें. नाना, पेशवे आपल्यापुढें क्षमा याचना करीत आहेत. हात जोडून काकुळतीनें प्रार्थना करीत आहेत. असें दृश्य तो पाहूं लागला. त्याचा अुत्साह द्विगुणित झाला. सारें पुणें धुळीला मिळवावयाचें! कोणाचेंही कांहीं

अैकावयाचें नाहीं. दगड नि दगड अुखडून काढावयाचा ! वीट नि वीट तुडवून टाकायची. घर नि घर जमीनदोस्त करावयाचें अशा अिर्ष्येनें तो तांतडीनें निघाला.

पुण्याला वार्ता आली. निजाम पुण्यावर चाल करून येत आहे. सारें पुणें खडबडून जागें झालें. सर्वांच्या डोळ्यावरची झोप अुडाली. भेदभाव क्षणांत ओसरले. अभिमानानें नजरा फिरल्या. स्वतः सवाअी माधवराव निजामाला तोंड द्यायला बाहेर पडले.

दोन्ही सैन्यांची खड्यांला गांठ पडली. निजामाच्या छावणीसमोर मराठ्यांची छावणी पडली. गोटाकरितां प्रत्येक सरदाराला जागा नेमून देण्यांत आल्या आणि त्याच वेळेस मराठ्यांच्या छावणींत असंतोषाचे वारे वाहूं लागले.

कळंबीकरांचा गोट सैन्याच्या अैन मध्यभागीं आला, हें पाहतांच भोंवतालच्या ब्राह्मण-मराठे सरदारांचीं मस्तकें फिरूं लागलीं. त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला पोंचली. “महाराचा गोट आमच्यामध्यें ! काय भ्रष्टाकार ! महाराची सांवली अंगावर पडली तर स्नान करणारे—सचैल स्नान करणारे धर्मनिष्ठ लोक आम्ही ! ह्या आमच्या शेजारी शिदनाक महाराचा गोट ! असा सावळा गोंधळ आम्ही चालूं देणार नाहीं.” सारे चिडून सवाअी माधवरावाकडे आले.

“महाराज, हा काय अनाचार ! आपण धर्मरक्षक. धर्माकरितां आपला अवतार. धर्म हा मराठेशाहीचा प्राण; असा विपरित प्रकार आपण समक्ष असतां कसा होतो ? शिदनाक आमच्या मांडीला मांडी लावून ठाण मांडणार ! धर्म-जात यांच्या नरडीला नख लावलें जात आहे; आपण उघड्या डोळ्यांनीं हें पाहणार ?” अेक सरदार धीटपणानें म्हणाला.

सवाअी माधवराव प्रभु गोंधळले. समोर शत्रू अुभा आहे. कडेकोट तयारीनें झुंज द्यायला सज्ज झाला आहे. सर्वस्व पणाला लावून चवताळून

आला आहे. त्याला तोंड द्यावयाचें असतां आपसांत फूट पडत आहे. आपल्याच सरदारांत नाराजी अुत्पन्न होत आहे—काय करावें अशा वेळेस ?

भोंवतीं कांहीं प्रमुख सरदार गोळा झाले होते. त्यांपैकीं वयोवृद्ध हिरोजी पाटणकराकडे माधवरावांनीं अपेक्षेनें पाहिलें.

हिरोजी पाटणकर अुठून अुभे राहिले. त्यांनीं तीव्र नजरेनें समोरच्या सरदारांकडे पाहिलें. त्यांचे डोळे आरक्त झाले. प्रसंग कोणता ? त्याचें महत्त्व काय ? अशा वेळेस हे क्षुद्र वाद अुकरून काढणाऱ्या लोकांची त्यांना चीड आली. त्याच्या कोत्या वृत्तीचा त्यांना विषाद वाटला. ते गंभीरपणानें म्हणाले,

"हा वीरांचा मेळावा आहे. येथें शत्रूंच्या रक्तानें स्नान करायचें असतें. ही जेवणारांची पगंत नाहीं. तरवार धरणाऱ्या शूरांची पगंत आहे. शत्रूंच्या मुडद्यांची येथें गिधाडांना मेजवानी द्यायची असते ! येथें प्राणाच्या सौद्यानें हिशेब चालतो. ज्यांचें मनगट बळकट, ज्याच्या तरवारीची धार तिखट, त्याला या मेळाव्यांत मानाचा तुरा मिळतो. तो कोणत्याही जातीचा असो. त्याचा विचार कोण करणार ? शिदनाक महार असेल, पण त्याची तरवार फार तीक्ष्ण आहे. या आणीबाणीच्या प्रसंगीं अशा क्षुद्र विचाराला थारा देणें योग्य नाहीं. समोर शत्रु उभा आहे. तुमचा संताप, तुमचा आवेश तुमचा पराक्रम त्याला दाखवा. सोवळें ओवळें पुण्याला परत गेल्यावर सांभाळतां येअील. नाहींतर प्रसंगीं शत्रूकडून विटंबना होअील. प्रसंगाचें मोल ओळखा. नसते वाद अुकरून काढूं नका. शिदनाकचा गोट आहे तेथेंच राहील."

सवाअी माधवरावांनीं मान डोलावली. अुमजणारे अुमजले. जाणत्यांनीं प्रसंगाकडे लक्ष दिलें. आणि बाकीच्यांनीं हिरोजीच्या डोळ्याकडे पाहातांच आपलें मनाला दडपून गप्प बसविलें.

लढाअीला तोंड लागलें. दोन्ही पक्षांनीं जिवाची तमा न धरतां झुंज सुरू केली. तरवारींवर तरवारी आपटून ठिणग्या अुडं लागल्या. मृत्यू बेभान नाचूं लागला.

निजामाच्या लोकांनीं परशुरामभाअु पटवर्धनांना कोंडींत पकडलें. मराठ्यांचा अेक मातवर मोहरा कचाटींत अडकला. परशुराम भाअुंचें अेकाकीं बळ अपुरें पडूं लागलें. चारी बाजूंनीं शत्रूनें आवळून आघात सुरू केले. भाअूंची तरवार सारखी नाचत होती. हळुहळू तिची गति मंदावूं लागली. शत्रूला जोर चढला. त्यांनीं अेकच घेमार सुरू केली.

कोण भाअूंच्या मदतीला जाणार? कोणाच्या अंगीं तो चक्रव्यूह भेदायचें सामर्थ्य होतें? कांहीं मराठे सरदार डोळे फाडून समोर पहात होते; पण त्या दंगलींत अुडी घ्यायला त्यांना हिंमत झाली नाहीं. ते कचरले. हतबुद्ध होअून टकमक पहात राहिले.

शिदनाक महारानें दुरून भाअूंकडे पाहिलें. सर्व स्थिति अेका क्षणांत त्याच्या डोळ्यासमोर अुभी राहिली. त्यानें आपल्या लोकांना खूण केली, व तो आवेशानें भाअूंकडे धांवत गेला.

अुफाळलेल्या सिंहाप्रमाणें अुसळी घेअून तो भाअूंच्या शेजारीं जाअून अुभा राहिला. त्याच्याकडे पाहातांच भाअूंच्या चेहऱ्यावर हसूं अुमटलें त्यांच्या थकलेल्या शरिरांत नवचैतन्य वाहूं लागले. त्यांची तरवार बिजेसारखी चमकूं लागली. शिदनाकनें तर पराक्रमाची शर्थ केली. त्यानें शत्रूंच्या सैन्यांत हाहाःकार अुडविला, त्यांना कृतांत पुढें अुभा आहे, असें वाटूं लागलें. त्यांच्या हातांतील तरवारी गळून पडूं लागल्या.

लढतां लढतां त्याचा पराक्रम पाहून भाअू आवेशानें ओरडलें, "शाबास शिदनाक शाबास! खरा क्षत्रिय आहेस, वीराचा बच्चा आहेस."

किती वेळ रणकंदन चाललं होतें!

लढाअीचा रंग पालटला. डाव अुलटला. निजामाची धुंदी अुतरली. त्याची हड्डी नरम झाली. शरीर खिळखिळें झालें. प्राण कंठाशीं आलें.

सांगाल तसा, म्हणाल त्या अटीवर तह करायला मी तयार आहे; असा त्यानें पेशव्यांना निरोप पाठविला.

लढाअी संपली. मराठ्यांनीं पंचवीस वर्षांचें अपयश धुवून काढलें.

दरबार भरला. विजयी वीरांचें, पराक्रम गाजविणारांचें, खऱ्या क्षत्रियांचें अभिनंदन करण्यांत आलें. परशुरामभाअूंनीं शिदनाकची–कळंबीकरांची अशी तारीफ केली, त्यांच्या पराक्रमाचें असें वर्णन केलें आणि तें करीत असतां त्यांच्या विरुद्ध तक्रार करणाराकडे मोठ्या मिष्कील दृष्टीनें पाहिलें.

त्यांचे चेहरे पाहाण्यासारखे झाले.

आणि हिरोजी पाटणकरांनीं त्यांच्याकडे अशा तीव्र नजरेनें पाहिलें–जणु ते त्यांना नजरेनें विचारीत होते, "कळलें शिदनाकचा गोट मध्यभागीं कां होता तें? कोणाचे गोट छावणींतून बाजूला काढावयाचें हें आलें कां ध्यानांत? समजलें कां खरा क्षत्रिय कोण तें? वीराची जात त्याच्या मनगटांत असते. ती त्याच्या तरवारीच्या धारेवर आढळते. आतां करीत बसा तुमचें सोंवळें–ओंवळें" आणि त्या दृष्टीचा अर्थ कळूनच कीं, काय त्यांनीं पाटणकरांकडे पाहतांच लाजेनें खालीं माना घातल्या.

खर्ड्याच्या लढाअीनें आम्हांला नवा धडा शिकविला. "जातीचें तुणतुणें वाजविणें अयोग्य आहे. माणसाची योग्यता त्याच्या पराक्रमावर गुणांवर अवलंबून असते. पराक्रम दाखवील तो वीर, तो क्षत्रिय. महत्कार्यें पराक्रमानें पार पडतात. जुन्या श्रेष्ठाश्रेष्ठतेच्या कल्पना आम्ही सोडून दिल्या पाहिजेत. त्यांना मूठमाती द्यायला पाहिजे. गुणांची कदर करायला आम्हीं शिकलें पाहिजे."

पण पुण्यांत पाऊल टाकल्याबरोबर अनुभवानें शिकविलेला हा धडा आम्ही विसरलों. खर्ड्यांच्या लढाईनें दिलेली ही दृष्टि बुरसलेल्या भावनांनीं झांकळून गेली. नव विचारांचें तेज आम्हांला मानवलें नाहीं. रुढीच्या शृंखला तोडायला आमचें दुबळें हृदय समर्थ झालें नाहीं.

आणि त्यामुळेंच खर्ड्यांचा विजय हा आमचा शेवटचा विजय ठरला.

त्या लढाईनें शिकविलेला हा दिव्य धडा जर आम्ही गिरविला असता तर इंग्रजापासून पुण्याचें रक्षण करण्याकरितां पुण्याभोंवतीं सोवळ्यांचा कोट उभारण्याची मूर्खपणाची कल्पना आमच्या डोक्यांत आली नसती आणि आमचा पुढचा सारा इतिहास अगदीं निराळा झाला असता.

---

## शहान्शहा

आज दिल्ली शहर आनंदानें उत्फुल्ल झालें होतें. सर्व रस्त्यांवर रंगीबेरंगी पताका फडकत होत्या. स्त्रीपुरुष हर्षानें वेडे झाले होते. नगर सजविण्यांत आबालवृद्ध गढून गेले होते. प्रत्येकानें आपलें घर शृंगारलें होतें. ठेवणींतील मूल्यवान पोषाख सर्वांच्या अंगावर विलसत होता. सर्वांचे चेहरे आनंदानें चमकत होते. आसन्नमरण वृद्धांनाही नवजीवन प्राप्त झाल्यासारखें वाटत होतें. वस्तुवस्तूंतून आनंद उसळत होता.

आज दिल्लीचे बादशहा-शहाअलम यांना महादजी शिंद्यांनीं दिल्लीला परत आणलें होतें.

बिचारा शहाअलम बारा वर्षं वनवासांत फिरत होता. एखाद्या भणंगभिकाऱ्याप्रमाणें मदतीची याचना करीत वणवण भटकत होता. दिल्लीचा हा सम्राट देशोधडीला लागून हालअपेष्टा भोगीत होता. अयोध्येच्या वजीराचा त्याला मोठा भरंवसा. अत्यंत आशेनें त्यानें त्याच्याकडे पाहिलें. आपला हा शूर सरदार आपल्याला दिल्लीला जाण्यास खात्रीनें मदत करील

असें वाटून त्यानें त्यांच्याकडे धांव घेतली होती. पण स्वतःच्या राज्याचा बंदोबस्त करण्यांत तो चूर होता. एवढें जबाबदारीचें काम अंगावर घेऊन आपला नाश करून घेण्याची त्याची तयारी नव्हती. अत्यंत लाचार होऊन बादशहानें इंग्लिशांना मदत करण्याची प्रार्थना केली पण धोक्याचें धाडस पत्करतांना, नेहमीं फायद्याचा कांटा डोळ्यासमोर ठेवणाऱ्या इंग्लिश कंपनीनें हें साहस करण्याचें नाकारून बादशहाला नुसतें झुलवीत ठेविलें. सर्वांचा बांदशहाला विपरीत अनुभव आला. कठीण समयीं कोणी कोणाच्या उपयोगी पडत नाहीं. हें कटु सत्य त्याला पटलें.

तो अत्यंत निराश झाला; पण दिल्लीला परत जाण्याची आशा त्याच्यानें सोडवेना. ज्या दिल्लीमध्यें त्याच्या पूर्वजांनीं वैभवाचा उपभोग घेतला, ज्या दिल्लींतील सिंहासनावर बसून त्याच्या वाडवडिलांनीं सर्व हिंदुस्तानवर सत्ता चालविली, ज्या दिल्ली शहरांतील राजवाड्यांचें वैभव सर्व जगांत अतुलनीय होतें, त्या दिल्ली शहरांत पाय ठेवण्यापूर्वीं आपले डोळे मिटूं नकोस अशी एकच प्रार्थना तो परमेश्वराला करीत असे.

एक संपूर्ण तप लोटलें; पण बादशहाची इच्छा पूर्ण झाली नाहीं. जस-जसें दिवस जाऊं लागले तसतशी त्याची निराशा वाढूं लागली. त्याचें हृदय व्याकूळ झालें. चिंतेनें तो रात्रंदिवस तळमळूं लागला. अशा वेळेस महाराष्ट्राचा एक सत्पुत्र पुढें आला. आपल्या पराक्रमानें बादशहांच्या शत्रुंचीं बांडगुळें त्यानें कापून टाकलीं. दिल्लींतील बजबजपुरी त्यानें नाहींशीं केली. पाटीलबुवांनीं मोठ्या सन्मानानें व इतमानानें बादशहांना घेऊन दिल्लींत प्रवेश केला. बादशहाच्या डोळ्यांचें पारणें फिटलें.

---

आपल्या बादशहाच्या दर्शनाकरितां सर्व दिल्लीशहर उत्सुक झालें होतें. बारा वर्षांतील बेबंदशाहीनें लोकांना अगदीं हैराण केलें होतें. आपला बादशहा आपणांस पुन्हां बघायला मिळावा, त्यानें दिल्लीला पुन्हां यावें

म्हणून देवाची रोज प्रार्थना करीत असत. त्यांची प्रार्थना देवानें ऐकली. त्यांचा बादशहा त्यांना परत मिळाला.

बादशहांना केव्हां पाहूं असें सर्वांना झाले होतें हें खरें; पण त्यापेक्षांहि पाटीलबुवांच्या दर्शनाची त्यांना अधिक तळमळ लागली होती. बादशहा सर्व शहरांतून फिरावयास निघाले. सजविलेल्या हत्तीवरून मिरवणूक निघाली. बादशहांनीं पाटीलबुवांना आपल्या उजव्या बाजूस बसविलें.

सर्व रस्ते नरनारींनीं फुलून गेले. महादजींकडे पाहून सर्वांचीं हृदयें भक्तीनें व आदरानें भरून गेलीं. त्यांच्या बादशहाला त्यांनीं परत आणलें होतें.

त्यांचें हरवलेलें धन त्यांनीं परत दिलें होतें. म्हातारीं माणसें महादजी-कडे पाहून आनंदाश्रू गाळीत होतीं. आपण महादजीप्रमाणें पराक्रम करावा, ह्या महत्वाकांक्षेनें तरुणांचीं मनें व्यापून गेलीं होतीं. स्त्रिया आपल्या मुलांना महादजींकडे बोट करून सांगत होत्या, "ते पहा पाटीलबुवा, त्यांच्या पराक्रमानें त्यांनीं आपल्या बादशहांना बारा वर्षांनीं दिल्लीस परत आणलें. असाच तुम्हींहि पराक्रम करावयास पाहिजे."

मिरवणूक संपल्यावर दरबार भरला. दरबारांत प्रवेश करितांच सर्व सरदारांनीं त्यांना मुजरा केला. सर्वांचे मुजरे घेत घेत बादशहा व पाटीलबुवा सिंहासनापर्यंत गेले. बादशहा सिंहासनावर चढून उमे राहिले. त्यांनीं सर्व दरबाराकडे स्मित दृष्टि टाकली. नंतर त्यांनीं आपल्या बाजूला पाहिलें. पण त्यांना पाटीलबुवा तेथें दिसले नाहींत. पाटीलबुवा सिंहासनाच्या खालच्या पायरीजवळ उमे होते.

दिल्लीच्या बादशहांचें—हिंदुस्तानच्या सम्राटाचें तें सिंहासन होतें. हीन मनोवृत्तींच्या दुष्टांनीं तें पायदळीं तुडविलें असेल, पण त्याला स्पर्श करणें पाटीलबुवांना रुचलें नाहीं. ते उजवीकडच्या वजीराच्या सिंहासनाकडे वळले.

तोंच बादशहा लगबगीनें खालीं आले. त्यांनीं पाटीलबुवांच्या खांद्यावर हात टाकला व त्यांना मृदुस्वरांत प्रेमानें विचारलें. " तिकडे कोठें निघालांत ? वर कां नाहीं आलांत ? "

" तें सम्राटाचें—आपलें सिंहासन आहे ! दैवगतीच्या फेऱ्यानें आपणाला प्रतिकुल काळ आला म्हणून तें आपणांस सोडावें लागलें. त्याला आपलेच पाय लागले पाहिजेत ! त्यावर बादशहांनींच बसावयाला पाहिजे ! इतरांनीं त्याला स्पर्श करणें अयोग्य आहे. "

" पाटीलबुवा, मी बादशाह आहे हें खरें ! पण या सिंहासनाला माझे पाय लागायला आपण कारण आहांत ! एकाद्या भणंगभिकाऱ्याप्रमाणें सैरावैरा भटकणाऱ्या या बादशहाला त्याची बादशाही बहाल करणारे आपण शहानशहा आहांत ! "

सर्वांनीं पाटीलबुवांचा व बादशहाचा जयजयकार केला. बादशहांनीं महादजींना सिंहासनावर आपल्या उजव्या बाजूस बसवितांच झालेला जयनाद तर दिगंतरीं पोंचला.

बा. क्र. ...२३.८३ ... वि. ...७११

IRBK-0102383

IRBK-0102383

ग्र. [illegible] ठाणे